वर्ष ४६
अंक १०

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

|| मराठी तितुका मेळवावा ||

On the Web
www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील
एकमेव मराठी मासिक

ऑक्टोबर २०२६
भाद्रपद/आश्विन
शके १९४८


प्रिय बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सर्व सभासदांनो, कार्यकर्त्यांनो, स्वयंसेवकांनो आणि जगभरातील मराठी बांधवांनो,
सप्रेम नमस्कार!

सप्टेंबर महिना आपल्या सर्वांसाठी **गणेशोत्सव, संस्कृती, सेवा आणि सामूहिक सहभागाचा** राहिला. उत्तर अमेरिकेतील विविध मराठी मंडळांनी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला. या सर्व कार्यक्रमांमध्ये सहभागी झालेल्या **प्रत्येक मंडळाचे, स्वयंसेवकांचे, कलाकारांचे आणि कुटुंबांचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार!**

गणेशोत्सवाच्या व्यस्त काळातही BMMच्या **Executive Committee मधील प्रत्येक सदस्याने विविध जबाबदाऱ्या आणि उपक्रमांसाठी वेळ देत उत्कृष्ट काम केले.** BMM Marathi Shala, BMM Yuva, BMM Podcast, Aarogya Sampada, Give Back to Karmabhoomi, शिक्षक प्रशिक्षण, अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तक उपक्रम आणि इतर initiatives **नवीन कल्पना, नवीन नेतृत्व आणि वाढत्या सहभागासह** पुढे जात आहेत.



**भारतीय वाणिज्य दूतावास, न्यूयॉर्क भेट:** सप्टेंबरमध्ये BMMचे प्रतिनिधित्व करत भारतीय वाणिज्य दूतावास, न्यूयॉर्क येथे भेट देण्याची संधी मिळाली. **Secretary (CPV & OIA) श्रीमती श्रीप्रिया रंगनाथन, Consul General श्री बिनय एस. प्रधान आणि Joint Secretary श्री अनकन बॅनर्जी** यांच्यासोबत झालेला संवाद अत्यंत सकारात्मक आणि उपयुक्त होता. या भेटीत **उत्तर अमेरिकेतील मराठी समाजाची ताकद, BMMची व्याप्ती आणि आपल्या विविध उपक्रमांची माहिती** मांडण्याची संधी मिळाली. लवकरच विविध मराठी मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना आणि Consulateच्या अधिकाऱ्यांना एकत्र आणून **आपल्या समाजासाठी उपलब्ध संधी, मार्गदर्शन आणि सहकार्य कसे वाढवता येईल**, याबाबत संवाद आयोजित करण्याचा माझा प्रयत्न आहे.

**Give Back to Karmabhoomi:** "ज्या समाजात आपण राहतो, त्या समाजाला आपण काय परत देतो?" हा प्रश्न या उपक्रमाच्या केंद्रस्थानी आहे.

याच विचारातून मी **BMM President's Challenge** सुरू करत आहे. प्रत्येक तिमाहीत एक सामाजिक उद्दिष्ट असेल. तो पूर्ण करणाऱ्या मंडळाला **"BMM President's Challenge Trophy"** देण्यात येईल. हा केवळ पुरस्कार नाही. ही आपल्या समाजसेवेची ओळख असेल.

**या तिमाहीचे Challenge: "एक पोलिस स्टेशन – एक दिवाळी भोजन"**

आपल्या जवळच्या Police Station ला भेट द्या आणि दिवाळीनिमित्त तेथील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी Lunch आयोजित करून त्यांच्या सेवेसाठी त्यांचे आभार माना.

**Bonus Challenge:** आपल्या जवळच्या Food Bank, Foster Care किंवा अशा सामाजिक संस्थेला भेट द्या. त्यांना विचारून अशा वस्तू द्या ज्या रोजच्या जीवनात अत्यंत आवश्यक आहेत, पण नियमित सरकारी मदत किंवा योजनांमध्ये त्या नेहमी समाविष्ट नसतात. उदाहरणार्थ: Sanitary Pads | Diapers | Baby Care Items | Personal Hygiene Products

मी स्वतः जवळच्या Food Bank ला भेट दिली असता तेथील कार्यकर्त्यांनी एक अत्यंत अस्वस्थ करणारी पण महत्त्वाची बाब सांगितली. काही गरजू मुलींना Sanitary Pads उपलब्ध नसल्यामुळे शाळेत जाणे टाळावे लागते.

लहान बाळांना पुरेसे Diapers उपलब्ध नसल्यामुळे ते एकच Diaper जास्त काळ वापरतात आणि त्यामुळे त्यांना त्वचेच्या समस्या निर्माण होतात. ही माहिती ऐकल्यानंतर मला जाणवले—
आपण मोठे प्रकल्प करण्याची वाट पाहण्याची गरज नाही. कधीकधी आपल्या हातातील एक छोटी मदत एखाद्याच्या जीवनात मोठा बदल घडवू शकते. म्हणूनच माझे सर्व मराठी मंडळांना आवाहन आहे. **आपण जिथे राहतो, तिथेच आपली कर्मभूमी आहे. त्या कर्मभूमीसाठी आपण काहीतरी देऊया!**

**छोटी मदत, मोठा बदल घडवू शकते.**

ऑक्टोबरमध्ये **नवरात्र, दुर्गाष्टमी, दसरा आणि विजयादशमी, कोजागिरी** च्या निमित्ताने विविध मंडळांमध्ये अनेक सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम होणार आहेत. त्याचबरोबर BMMच्या सर्व initiatives ना अधिक वेग देण्याचा प्रयत्न राहील. आपण सण साजरे करताना **संस्कृतीसोबत सेवा आणि समाजाशी जोडलेपण** ही जपूया.

सर्व BMM मंडळांना, स्वयंसेवकांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना **संस्कार जपूया, संस्कृती वाढवूया, नेतृत्व घडवूया आणि आपल्या कर्मभूमीला काहीतरी परत देऊया!**

आपला,

**श्री. राहुल देशमुख,**
अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**
बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र
स्थापना १९८१ (शिकागो)
संस्थापक:- कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, कै. जयश्री हुपरीकर

अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:
ईमेल: vrutta@bmmonline.org
बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-
**BMM Treasurer - Milind Kulkarni**
**16077 Caminito Tomas, San Diego, CA 92128**
**Ph: 408.600.4486**
**Email:** milind.kulkarni@bmmonline.org

**जाहिरातींचे दर:** पूर्ण पान: $ 200 अर्धे पान: $ 125
पाव पान: $ 100 अष्टमांश पान: $ 75
**Send your payments to: zelle@bmmonline.org**

वृत्त दर महिन्याला प्रसिद्ध होते. **आदल्या महिन्याच्या २० तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील.** लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशन योग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.

**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२६ - २०२८)**
**मताधिकार असलेले सदस्य**
अध्यक्ष: राहुल देशमुख, पिट्सबर्ग, पेनसिल्व्हेनिया
उपाध्यक्ष: नरेंद्र कल्याणकर, रॅले, नॉर्थ कॅरोलायना
सचिव: अमित कोर्डे, रिचमंड, व्हर्जिनिया
कोषाध्यक्ष: मिलिंद कुलकर्णी, सॅन डिएगो, कॅलिफोर्निया
सदस्य: उल्का नगरकर, शिकागो
ज्योत्स्ना कुरकुटे, कनेटिकट
संदीप पवार, कॅलगरी, कॅनडा
ऋषिकेश रानडे, टोरांटो, कॅनडा
हर्षद अण्णेगिरी, डेट्रोइट
**नियुक्त सदस्य**
माजी अध्यक्ष: प्रसाद पानवळकर, ऑस्टिन, टेक्सस
**विश्वस्त समिती**
अध्यक्ष : सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेटिकट
सदस्य: मंजुषा नाईक, वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा
सदस्य: संदीप दीक्षित, क्लिव्हलँड, ओहायो
प्रकाशक: बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

**Disclaimer:** The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.

## या अंकात

| | |
|---|---|
| अध्यक्षीय | १ |
| बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादक समिती | २ |
| BMM YUVA | ३ |
| BConnect Women Empowerment | ३ |
| उदय खिरे - विज्ञान, जिद्द आणि दोन देशांना जोडणाऱ्या सहकार्याची गोष्ट | ५ |
| BMM Vrutta Yuva Supplement | ८ |
| एका विद्यार्थिनीपासून मराठी शिक्षिकेकडे होणारा माझा प्रवास | ९ |
| अभ्यासाव्यतिरिक्त गवसलेली ओळख | १० |
| कविता: चोंक — एक अस्वल | १३ |
| कोजागिरी — चांदण्यांपासून आठवणींपर्यंत | १४ |
| कविता: मन...! | १५ |
| चौकटीबाहेरची झेप | १६ |
| कविता: ध्यान स्वर | १७ |
| दिवाळी अंक माहीती | १८ |
| म्हणून आम्हा गांधी पाहिजे! | १९ |
| MANA Paintings | २० |
| जाहिरात | २१-२९ |
| BMM CHESS TOURNAMENT – 2026 | ३० |

## संपादक समिती

ऋषिकेश रानडे
अपर्णा कोळेकर
शीतल रांगणेकर
गौतम पंगू
कोमल कुलकर्णी
विदुला कोल्हटकर

हया अंकाबाबत तुमचे मत नक्की कळवा :
Vrutta@Bmmonline.org



## BMM YUVA




**BMM YUVA उन्हाळी इंटर्नशिप कार्यक्रमाची यशस्वी सांगता**

बृहन्महाराष्ट्र मंडळ (BMM) YUVAतर्फे आयोजित आठ आठवड्यांच्या २०२६ सालच्या उन्हाळी इंटर्नशिप कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली. अमेरिका आणि कॅनडामधील २०० हून अधिक माध्यमिक व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला.

सॉफ्टवेअर, मूलभूत अभियांत्रिकी, आरोग्यसेवा, उद्योजकता आणि सादरीकरण कला या पाच शाखांमध्ये आयोजित कार्यक्रमात २० अनुभवी मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना करिअरविषयक मार्गदर्शन केले. संवाद, चर्चासत्रे आणि प्रत्यक्ष प्रकल्पांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांचा अनुभव मिळाला.

कार्यक्रमाची सांगता अंतिम प्रकल्पांच्या सादरीकरणाने झाली. विद्यार्थ्यांनी मोबाइल व सॉफ्टवेअर ॲप्स, नाविन्यपूर्ण उत्पादनांच्या संकल्पना तसेच विविध क्षेत्रांशी संबंधित प्रकल्प सादर केले. या सादरीकरणांतून त्यांची कल्पकता, तांत्रिक कौशल्ये आणि समस्या सोडवण्याची क्षमता अधोरेखित झाली.

कार्यक्रमाचे नेतृत्व मेघना मुंज आणि नीलम काणे यांनी केले. नियोजन, मार्गदर्शकांशी समन्वय आणि विद्यार्थ्यांची प्रकल्पांसाठी तयारी यामध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

BMMचे माजी अध्यक्ष प्रसाद पानवळकर यांच्या कार्यकाळात सुरू झालेला हा उपक्रम विद्यमान अध्यक्ष राहुल देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पुढे यशस्वीपणे राबवण्यात आला. त्यांच्या सहकार्यामुळे अधिकाधिक विद्यार्थ्यांना या संधीचा लाभ मिळाला.

विद्यार्थी, पालक, मार्गदर्शक आणि स्वयंसेवकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हा कार्यक्रम यशस्वी ठरला. करिअरच्या नव्या संधींची ओळख, आत्मविश्वासवृद्धी आणि प्रत्यक्ष अनुभव देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

## BConnect
## Women Empowerment

नमस्कार मंडळी,

BConnect अंतर्गत आपण बरेच उपक्रम राबवत आहोत. त्यामधीलच एक म्हणजे **महिला सशक्तीकरण (Women Empowerment)** आणि महिलांसाठी Business Connect हा एक स्वतंत्र ग्रुप आपण सुरू करत आहोत.

या ग्रुपच्या माध्यमातून महिलांसाठी विविध 'initiatives, projects, networking आणि business-related activities' राबवण्याचा आपला प्रयत्न असेल. एकमेकींना support करून नवीन संधी निर्माण करणे आणि स्वतःचं काहीतरी उभं करण्यासाठी एकत्रितपणे पुढे जाणे, हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

ज्या महिला स्वतःचा व्यवसाय सुरू करू इच्छितात, सध्या व्यवसाय करत आहेत, नवीन काहीतरी करण्याची इच्छा आहे किंवा इतर महिलांना support/contribute करू इच्छितात, त्यांनी कृपया खालील google फॉर्म भरून द्यावा. आम्ही त्यांना **'Mahila BConnect'** या ग्रुप मध्ये सामील करून घेऊ.

https://tinyurl.com/MahilaBConnect

आपण सगळ्या मिळून एक मजबूत, supportive आणि empowering network तयार करूया!



## उदय खिरे - विज्ञान, जिद्द आणि दोन देशांना जोडणाऱ्या सहकार्याची गोष्ट



**उदय खिरे** यांचा प्रवास म्हणजे शांतपणे, सातत्याने आणि मनापासून केलेल्या कामाची सुंदर कहाणी. २०२६ मध्ये बृहन्महाराष्ट्र मंडळ (BMM) या जागतिक मराठी संस्थेने सिएटल अधिवेशनात त्यांना “Science, Technology, Education & Research Award” देऊन सन्मानित केले. हा पुरस्कार त्या मराठी व्यक्तींना दिला जातो जे विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन आणि शिक्षण या क्षेत्रात खरोखरच मोठं योगदान देतात. उदय खिरे यांना हा सन्मान त्यांच्या अनेक वर्षांच्या ड्रग डिस्कवरी संशोधनासाठी, CheminPharma मधील नेतृत्वासाठी आणि कर्करोग तसेच इतर गंभीर आजारांसाठी नवीन उपचार विकसित करण्यातील महत्त्वपूर्ण कामासाठी मिळाला.

पण उदय खिरे यांची गोष्ट इथेच संपत नाही. ती फक्त एका वैज्ञानिकाची नाही—ती एका जिद्दी, शांत स्वभावाच्या, पण मोठी स्वप्नं पाहणाऱ्या व्यक्तीची आहे. पुण्यातील शिक्षण, रसायनशास्त्राची आवड, अमेरिकेतलं संशोधन, आणि नंतर स्वतःची कंपनी उभी करण्याचा धाडसी निर्णय—या सगळ्यांनी त्यांचा प्रवास घडवला आणि त्यांना आजच्या स्थानापर्यंत आणलं.

आज उदय खिरे दोन संस्थांचे नेतृत्व करतात—CheminPharma (USA) आणि Cheminpharma Products India Pvt. Ltd. (India). त्यांचं ध्येय अगदी स्पष्ट आहे: अमेरिकेतील औषध-संशोधनातील नवकल्पना आणि भारतातील उत्कृष्ट रसायनशास्त्र कौशल्य एकत्र आणून जागतिक दर्जाचं ड्रग डिस्कवरी काम करणे. त्यांच्या कामामुळे दोन्ही देशांतील वैज्ञानिक, संशोधक आणि उद्योजक एकत्र येऊन नव्या कल्पना, नवी औषधे आणि नवी दिशा शोधत आहेत.

उदय यांच्याशी बोलताना medicinal chemistry बद्दल त्यांना किती प्रचंड आवड आहे, हे लगेच जाणवतं. वेगवेगळ्या प्रकारच्या कर्करोगासाठी various kinases inhibitors, for example MEK inhibitors कसे उपयोगी पडतात, आणि औषधनिर्मिती क्षेत्रात नवनवीन कल्पना पुढे नेण्याबद्दल त्यांची तळमळ खूपच स्पष्ट दिसते. इतकं मोठं काम, इतक्या वर्षांची मेहनत आणि यश मिळूनही ते अतिशय नम्र, साधे आणि सहजपणे संवाद साधणारे आहेत. त्यांच्याशी बोलताना एक आपलेपणा जाणवतो—जणू एखाद्या जुन्या ओळखीच्या व्यक्तीशी गप्पा मारतोय असा.

बृ. म. म. वृत्ताच्या वतीने त्यांच्याशी संवाद साधताना आम्हाला खरोखरच खूप आनंद झाला. त्यांच्या कामाबद्दलची आवड, त्यांची नम्रता आणि विज्ञानाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन—हे सगळं समजून घेण्याचा अनुभव खूपच छान होता.

उदय, सर्वप्रथम BMM चा Science, Technology, Education & Research Award मिळाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन. हा अत्यंत प्रतिष्ठेचा सन्मान आहे. आपल्या प्रवासाबद्दल, विचारांबद्दल आणि भविष्यातील ध्येयांबद्दल आम्हाला सांगण्यासाठी आपण इतक्या मनापासून सहमती दर्शवलीत, त्याबद्दलही मनःपूर्वक आभार.

**प्रश्न: सुरुवातीला, स्वतःबद्दल थोडं सांगाल का? तुमचा आतापर्यंतचा प्रवास—शास्त्रज्ञ, शोधकर्ता, उद्योजक—या सगळ्या भूमिका तुम्ही कशा अनुभवता?**

**उदय:** माझं प्राथमिक, पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण सगळं पुण्यातच झालं. त्यानंतर NCL (CSIR-National Chemical Laboratory) मधून पीएच.डी. पूर्ण केल्यानंतर, १९९१ मध्ये मी पोस्टडॉक्टोरल रिसर्च साठी अमेरिकेत आलो. Purdue University मध्ये मला नोबेल पुरस्कार विजेते Prof. H.C. Brown यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली—हा अनुभव माझ्यासाठी खूप चांगला होता. त्यानंतर UC Irvine येथे Scott Rychnovsky यांच्यासोबत दुसरं पोस्टडॉक केलं.

ही दोन्ही अनुभव माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले. त्यामुळं मला complex synthetic chemistry अधिक खोलवर समजून घेता आली, आणि या क्षेत्रातील गुंतागुंतीचं, सखोल आणि प्रत्यक्ष काम करण्याचा अमूल्य अनुभव मिळाला.

**प्रश्न: अकॅडेमियातून Bayer सारख्या इंडस्ट्रीमध्ये जायचा तुमचा अनुभव कसा होता?**

**उदय:** अमेरिकेत पोस्टडॉक पूर्ण झाल्यानंतर माझ्या करिअरचा पुढचा टप्पा कनेटिकट मधील Bayer या फार्मास्युटिकल कंपनीत सुरू झाला. इथूनच माझं कनेटिकट मध्ये स्थायिक होणंही घडत गेलं. जवळपास अकरा वर्षे Bayer मध्ये मी medicinal chemist म्हणून cancer research वर काम करत होतो. विशेषतः ड्रग डिस्कवरी प्रोजेक्ट्स वर काम केलं, ज्यामध्ये एका B-Raf-kinase inhibitor चा प्रोजेक्टही होता. या molecule साठी आम्ही सगळं pre-clinical काम पूर्ण केलं. त्यानंतर तो molecule clinical trials पर्यंत पोहोचला आणि शेवटी त्याला एक औषध म्हणून मंजुरीही मिळाली. हे आमच्या मेहनतीचं मोठं यश होतं.

**प्रश्न: तुम्ही कर्करोगासाठी वापरल्या जाणाऱ्या multi-kinase inhibitors वर काम केलं आहे. साध्या भाषेत सांगायचं तर multi-kinase inhibitor म्हणजे नेमकं काय? आणि ते इतकं महत्त्वाचं का आहे?**

**उदय:** Kinase inhibitors ही कर्करोगासाठी वापरली जाणारी targeted therapy प्रकारातील औषधं आहेत. ही औषधं एकाच वेळी अनेक महत्त्वाच्या एन्झाइम्स ना ब्लॉक करु शकतात जे cancer cells वाढण्यासाठी आणि ट्यूमरला जगण्यासाठी लागणारा रक्तपुरवठा मिळवण्यासाठी आवश्यक असतात. साध्या भाषेत सांगायचं तर, ही औषधं ट्यूमरला वाढण्यासाठी लागणारा "इंधनपुरवठा" थांबवतात आणि अनेक म्युटेशन्स मुळे जे cellular pathway दोषी झाले असतील त्यांना थांबवण्याचे काम करतात.

Kinases म्हणजे आपल्या शरीरात असलेले सामान्य एन्झाइम्स किंवा प्रोटीन्स. हे एन्झाइम्स पेशींना "आता वाढा", "आता विभाजित व्हा" असे सिग्नल देतात—जणू ऑन-ऑफ स्विचेससारखे. कर्करोगात हे स्विचेस कायम "ऑन" स्थितीत अडकून बसतात, त्यामुळे पेशी अनियंत्रितपणे वाढत राहतात.

Inhibitors म्हणजे या एन्झाइम्समध्ये जाऊन बसणारी "किल्ली". जशी किल्ली लॉकमध्ये बसली की लॉक बंद होतं, तसं हे औषध (inhibitor) एन्झाइमचा स्विच "ऑफ" करतं. Multi-kinase inhibitors ची खासियत म्हणजे ते एकाच वेळी अनेक बिघडलेले स्विचेस बंद करतात. म्हणजेच औषध एकाच वेळी अनेक वेगवेगळ्या enzyme pathways ना ब्लॉक करून कर्करोगाची वाढ थांबवतं—आणि त्यामुळे त्याचा परिणाम अधिक प्रभावी ठरतो.

**प्रश्न: वैज्ञानिक म्हणून काम करताना उद्योजक बनायचा विचार कसा आला? कधी असा क्षण आला का की वाटलं—"अरे, आता स्वतःच काहीतरी सुरू करायचं!"**

**उदय:** ९० च्या दशकाच्या शेवटी kinase inhibitors हे क्षेत्र अजून अगदी नवीन होतं. त्याबद्दलची समजही आजच्या तुलनेत खूपच मर्यादित होती. Bayer मध्ये काम करत असताना माझ्या लक्षात आलं की kinase inhibitors कर्करोगाच्या वाढीचे मार्ग थांबवण्यात खूप उपयोगी ठरू शकतात; पण त्याच वेळी त्यात एक धोका देखील असू शकतो. कारण अशी औषधं निरोगी पेशींना "आता वाढ थांबवा" असे सांगणारे pathwaysही बंद करू शकतात. नंतर clinical data पाहताना एक गोष्ट खूप ठळकपणे दिसली—या drug मुळे काही रुग्णांचे survival साधारण ६ महिन्यांवरून थेट ५ वर्षांपेक्षा जास्त वाढलं होते. माझ्यासाठी आणि माझ्या टीमसाठी हा क्षण खूप महत्त्वाचा होता. आपण केलेल्या कामाचा परिणाम किती मोठा असू शकतो, याची खरी जाणीव यामुळे झाली. आणि याच अनुभवातून मला संशोधनातच राहून या क्षेत्रात आणखी खोलवर काम करण्याची प्रेरणा मिळाली. हे सगळे करत असताना, स्वतःचं काहीतरी करावं हा विचार मनात आधीपासूनच होता. Bayer मध्ये असतानाच ड्रग डिस्कवरीची व्यावसायिक बाजू समजून घेण्यासाठी मी Fairleigh Dickinson University मधून MBAही केलं. पुढे २००७ मध्ये Bayer ने कनेटिकट मधलं काम बंद करण्याचा निर्णय घेतला, तेव्हा मला वाटलं—उद्योजकतेकडे वळण्यासाठी हीच योग्य वेळ आहे.

हा निर्णय घेण्यासाठी माझी पत्नी स्वातीचा मला खूप मजबूत पाठिंबा मिळाला. त्यामुळेच मी हा मोठा निर्णय घेतला आणि CheminPharma ही कंपनी सुरू केली.

उद्योजकता क्षेत्र माझ्यासाठी नवीन होतं. सुरुवातीला venture capitalists मिळवणं कठीण होतं, त्यामुळे मी माझे स्वतःचे काही पैसे कंपनीत गुंतवले. CheminPharma ही कंपनी एक service-provider म्हणून सुरू झाली. न्यू हेवन, कनेक्टिकट मध्ये मी एक लॅब उभी केली आणि चार chemists कामावर घेतले. Yale विद्यापीठ अगदी जवळ असल्यामुळे तिथल्या अनेक प्रोजेक्ट्सवर आम्ही काम करू शकलो. त्याचबरोबर न्यू हेवन आणि बोस्टन परिसरातील काही छोट्या कंपन्यांसाठीही आम्ही काम केलं. हळूहळू कंपनीचा जम बसला आणि नियमित उत्पन्न मिळू लागलं.

**प्रश्न: CheminPharma आज अमेरिकेत एक छान नाव कमावलेलं आहे. या कंपनीचं ध्येय तुम्ही कसं सांगाल? आणि तिची काम करण्याची स्टाईल इतरांपेक्षा वेगळी कशी आहे?**

**उदय:** CheminPharma ही एक biotechnology आणि drug discovery services कंपनी आहे. साध्या भाषेत सांगायचं तर—औषधनिर्मिती आणि biotech क्षेत्राला आम्ही उच्च-गुणवत्तेचं preclinical संशोधन समर्थन देतो, आणि त्यात medicinal chemistry हा आमचा मुख्य आधार आहे.

कंपनी हळूहळू स्थिर होत असताना, माझी MEK inhibitor drugs मध्ये विशेष रुची वाढू लागली. या molecules चे गुणधर्म सुधारता येतील का, त्यांचे chemical issues कमी करता येतील का—अशा गोष्टींवर मी काम करू लागलो. आम्ही, मी आणि माझे ChemiPharma मधील सहकारी सर्वांनी मिळून काही molecules डिझाईन आणि तयार केले. यात विशेष उल्लेख म्हणजे माझा NCL मधील मित्र, Dr. Mahendra Chordia जो तेंव्हा CheminPharma मध्ये होता. माझ्या Bayer मधील एका माजी सहकाऱ्याच्या मदतीने त्यांची चाचणी केली. डेटा खूपच उत्साहवर्धक होता. तेव्हा मी Connecticut Innovations शी संपर्क साधला, आणि त्यांनी आम्हाला funding देण्यास होकार दिला. त्यानंतर २०११ मध्ये मी AlloMek Therapeutics ही स्वतंत्र कंपनी सुरू केली—MEK inhibitors च्या आधारे rare diseases आणि cancer साठी औषध विकसित करण्यावर लक्ष केंद्रित करणारी. आम्ही FDA कडे IND (Investigational New Drug) application दाखल करण्यासाठी लागणारं सर्व काम पूर्ण केलं—म्हणजेच मानवी clinical trials सुरू करण्याची तयारी झाली. त्यानंतर AlloMek Therapeutics ला Pasithea Therapeutics कडे विकण्यात आलं, कारण clinical trials चालवण्याचा त्यांचा अनुभव खूप मजबूत होता.

सध्या हे drug Phase 1 clinical trial मध्ये आहे. याच औषधाचा उपयोग Neurofibromatosis type 1 (NF1) या दुर्मिळ आजारासाठीही होतो, तसेच काही इतर आजारांसाठीही त्याची चाचणी सुरू आहे. आत्तापर्यंतचा डेटा अपेक्षानुसार खूप चांगला आहे. Pasithea सोबत मी consultant म्हणून काम करत राहिलो, पण माझं मुख्य लक्ष पुन्हा CheminPharma कडे वळलं—जिथे नाविन्यपूर्ण संशोधन आणि नवीन कल्पनांना आकार देण्याचं काम सतत सुरू असतं.

**प्रश्न: अलीकडे तुम्ही भारतात Cheminpharma Products India Pvt. Ltd. कंपनी सुरू केली. त्याबद्दल थोडं सांगाल का?**

**उदय:** भारतामधील CheminPharmaचं मुख्य लक्ष्य अगदी स्पष्ट आहे—नवीन आणि नाविन्यपूर्ण केमिस्ट्री संशोधन. यासाठीच आम्ही पुण्यात एक लॅब सुरू केली आहे. इथे शरीरात नैसर्गिकरित्या चालणाऱ्या प्रक्रियांना समजून घेऊन proteins degrade करण्याचे नवे मार्ग शोधण्याचं काम चालू आहे. विशेषतः proximity-induced protein degradation हा आमच्या संशोधनाचा मुख्य केंद्रबिंदू आहे - आणि त्यात खूप रोमांचक शक्यता आहेत.

CheminPharma Pune ही पूर्णपणे innovation-driven कंपनी आहे. ती पारंपरिक Contract Research Organization सारखी काम करत नाही. त्याऐवजी आम्ही अमेरिकेतील कंपन्यांसोबत थेट सहकार्य करून प्रोजेक्ट्स पुढे नेतो. एखाद्या प्रोजेक्टमध्ये proof of concept मिळालं की मग आम्ही अमेरिकेतील कंपन्यांसोबत funding आणि collaboration च्या संधी शोधतो. म्हणजेच संशोधन आणि उद्योग—दोन्ही बाजू एकत्र आणण्याचा आमचा प्रयत्न असतो.

पुण्यात टॅलेंटची कमतरता नाही—हे आम्ही रोज अनुभवतो. NCL आणि स्थानिक विद्यापीठांतून आम्हाला उत्तम वैज्ञानिक मिळतात. त्यांना innovation शी संबंधित काम करण्याची खरी इच्छा असते, आणि तेच आमचं मोठं बळ आहे. मात्र भारतात venture capital (VC) culture अजून पूर्णपणे विकसित झालेलं नाही. त्यामुळे नाविन्यपूर्ण ड्रग डिस्कवरी साठी निधी मिळवणं हे अजूनही एक मोठं आव्हान आहे. पण तरीही—योग्य लोक, योग्य कल्पना आणि योग्य दिशा मिळाली की काम पुढे जातंच.

**प्रश्न: तुम्हाला BMM कडून Science, Technology, Education & Research Award मिळाला - जागतिक मराठी समुदायाकडून मिळालेला हा सन्मान तुम्हांला का महत्वाचा वाटतो?**

**उदय:** CTMM म्हणजे कनेटिकट मराठी मंडळाच्या संस्थापक सदस्यांपैकी मी एक आहे आणि २०१२ ते २०१४ या काळात मी त्याचा अध्यक्ष सुद्धा होतो. त्यामुळे या काळात BMM शी मी अजून जवळून जोडलो गेलो आणि BMM कडून दिल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या पुरस्कारांचीही मला माहिती झाली. २०२६ मध्ये ड्रग डिस्कवरी च्या क्षेत्रात अनेक वर्षं काम केल्यानंतर Science, Technology,

Education and Research Award साठी nomination ची संधी मिळाली. मला वाटलं की माझं काम व्यापक मराठी समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी ही योग्य वेळ आहे.



या संपूर्ण nomination आणि evaluation च्या प्रक्रियेदरम्यान माझ्याशी सतत संपर्क ठेवल्याबद्दल मी BMM चे माजी अध्यक्ष प्रसाद पानवळकर यांचे विशेष आभार मानू इच्छितो.

**प्रश्न: विज्ञान आणि उद्योजकतेपलीकडे, तुम्ही समाजाशी कसे जोडलेले राहता? मेंटॉरिंग, सेवा किंवा इतर कोणत्या गोष्टी तुम्हाला मनापासून करायला आवडतात?**

**उदय:** BMM च्या उपक्रमांमध्ये मी आजही सक्रिय आहे - विशेषतः BConnect सारख्या community-based कमिटी मध्ये मी आता volunteer करत आहे. त्याचबरोबर मी Garje Marathi या उपक्रमातही सहभागी आहे, आणि त्यातून विद्यार्थ्यांना Pharmaceutical industry बद्दल मार्गदर्शन करतो. भविष्यात या दोन्ही उपक्रमांमध्ये काही समान धागे सापडले, काही एकत्रित काम करता आलं, तर मला ते नक्कीच शोधायला आवडेल.

CTMM मध्येही मी सक्रिय आहे. तिथल्या क्रिकेट, टेबल टेनिससारख्या हलक्या-फुलक्या उपक्रमांमध्ये सहभागी होणं मला खूप आवडतं. समुदायाशी जोडून राहणं, लोकांशी संवाद साधणं—हे सगळं माझ्या दैनंदिन आयुष्याचा एक महत्त्वाचा भाग बनलं आहे.

**प्रश्न: Cheminpharma Medicinal Chemistry आणि Chemical Development या क्षेत्रांत काम करते. या दोन्ही क्षेत्रांत drug development ची प्रोसेस वेगवान करण्यासाठी AI चा बराच वापर होऊ लागला आहे. या वाढत्या वापराबद्दल तुमचे काय मत आहे?**

**उदय:** आजच्या काळात AI किती उपयोगी ठरू शकतं, याचं मला खूप कौतुक वाटतं—विशेषतः communication व्यवस्थापन, literature search किंवा दैनंदिन कामं जलद करण्यासाठी. पण यापेक्षा मोठा फायदा AI ड्रग डिस्कवरी मध्ये देऊ शकतं. औषध शोधण्याची प्रक्रिया किंवा clinical trials साठी योग्य रुग्ण निवडण्याचं काम AI मुळे खूप वेगानं आणि अचूकपणे होऊ शकतं. जर AI एखाद्या drug चा half-life, toxicity किंवा bioavailability आधीच predict करू शकत असेल, तर ते खूप मोठं पाऊल ठरेल. यामुळे लॅबमध्ये कराव्या लागणाऱ्या अनेक चाचण्या आणि मेहनत वाचेल, आणि संपूर्ण प्रक्रिया अधिक जलद आणि कार्यक्षम होईल.

**प्रश्न: आज pharmaceutical क्षेत्रात करियर करू पाहणाऱ्या अमेरिकेतल्या आणि भारतातल्या तरुणांना काय सल्ला द्याल?**

**उदय:** आजच्या तरुण पिढीसाठी—विशेषतः ज्यांचा biology, biotech, ड्रग डिस्कवरी किंवा computational biology मध्ये चांगला पाया आहे—हे क्षेत्र खूपच उत्साहवर्धक आहे. इथे नवीन कल्पना, संशोधन आणि करिअर वाढवण्यासाठी भरपूर संधी आहेत. भारतातील तरुणांसाठीही परिस्थिती आता बदलत आहे. जरी भारतातील Pharmaceutical Industry अजूनही मुख्यतः service-oriented किंवा generic drugs वर केंद्रित असली, तरी अलीकडे अनेक छोटी, पण अत्यंत महत्त्वाकांक्षी start-ups उभ्या राहत आहेत. या start-ups innovative chemistry आणि biology वर काम करत आहेत—नवीन molecules, नवीन तंत्रज्ञान, आणि नवीन संशोधन पद्धती. त्यामुळे भारतातही नाविन्यपूर्ण ड्रग डिस्कवरी साठीची दारं आता हळूहळू उघडत आहेत.

तरुणांनी योग्य दिशा निवडली, कौशल्यं विकसित केली आणि धाडस दाखवलं, तर या क्षेत्रात त्यांच्यासाठी खूप सुंदर भविष्य आहे.

**मुलाखतकार: गौतम पंगू,** फिलाडेल्फिया;
**कोमल कुलकर्णी,** कनेटिकट

## BMM Vrutta Yuva Supplement

**A call to Marathi -Noth American Youth!**

It's an exciting time to be a Marathi-American young person! You are seamlessly blending your two identities and charting your own unique path. You're reaching new heights in education, careers, business, politics, the arts, social service, and so many other fields.

And we want to hear from you!

We want to celebrate your successes, understand your challenges, hear about your dreams and aspirations, and learn your thoughts and perspectives.

That's why we're planning to launch a BMM Vrutta Youth Supplement in the near future—a bilingual (Marathi/English) publication for youth, by youth.

Interested in joining the Youth Supplement team? Want to help shape its vision and agenda? Or simply curious to learn more? Drop us a line at Vrutta@bmmonline.org

This is a wonderful opportunity to learn and gain hands-on experience in the creative, editorial, administrative, and outreach aspects of running a publication.

We can't wait to hear from you and, together, create something that reflects the voices and experiences of Marathi-American youth!

**मराठी - उत्तर अमेरिकन तरुणांना आवाहन!**

मराठी-अमेरिकन तरुणांसाठी हा एक अतिशय उत्साहवर्धक काळ आहे. मराठी आणि अमेरिकन अशा तुमच्या दोन्ही ओळखींचा समन्वय साधून तुम्ही तुमचा जीवनप्रवास करत आहात. शिक्षण, व्यवसाय, नोकरी, राजकारण, कला, समाजसेवा अशा विविध क्षेत्रांत तुम्ही नवनवीन शिखरे गाठत आहात.

आणि म्हणूनच आम्हाला तुमच्याकडून ऐकायचं आहे! तुमचं यश साजरं करायचं आहे, तुमच्या अडचणी आणि संघर्ष समजून घ्यायचे आहेत, तुमची स्वप्नं, आकांक्षा, विचार आणि मतं जाणून घ्यायची आहेत.

याच उद्देशाने बृहन्महाराष्ट्र मंडळ वृत्तातर्फे लवकरच BMM वृत्ताची युवा पुरवणी सुरू करण्याचा आमचा मानस आहे—तरुणांनी तरुणांसाठी चालवलेली स्वतंत्र द्विभाषिक (मराठी/इंग्रजी) पुरवणी!

तुम्हांला या युवा पुरवणीच्या टीममध्ये सहभागी व्हायला आवडेल का? तिची दिशा आणि विषय ठरवण्यात सहभाग घ्यायचा आहे का? किंवा याबद्दल अधिक जाणून घेण्याची उत्सुकता आहे का?

तसं असेल तर आम्हांला Vrutta@bmmonline.org वर नक्की कळवा.

प्रकाशनाच्या कामातील लेखन, संपादन, व्यवस्थापन आणि वाचकांपर्यंत पोहोचण्याचे विविध पैलू प्रत्यक्ष अनुभवण्याची ही एक उत्तम संधी असेल.

तुमच्याकडून ऐकण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत! मराठी-अमेरिकन युवा पिढीचा आवाज आणि अनुभव या पुरवणीमधून उमटू देण्यासाठी आम्हांला तुमची साथ हवी आहे.



# एका विद्यार्थिनीपासून मराठी शिक्षिकेकडे होणारा माझा प्रवास



माझा मराठीशी संबंध अगदी लहानपणापासून आहे. नऊ वर्षांची असताना मी BMMच्या मराठी शाळेत शिकायला सुरुवात केली. मी लहानपणापासून घरी मराठी बोलायचे, त्यामुळे मला वाटायचे की मला मराठी खूप छान येते. पण एक गोष्ट होती जी मला अजूनही येत नव्हती—मराठी वाचणे आणि लिहिणे.

पण मग मी मराठी शाळेत का जॉइन केले? अमेरिकेत राहणाऱ्या एका मुलीला मराठी वाचायला आणि लिहायला शिकण्याची गरज का वाटली?

एका उन्हाळ्यात मी माझ्या मैत्रिणीच्या घरी गेले होते. जेवल्यानंतर तिच्या आईने आम्हाला मराठीचा सराव करायला बोलावले. माझ्या मैत्रिणीने आणि तिच्या छोट्या बहिणीने सगळी अक्षरे आणि त्यांचे शब्द वाचले. मला काहीच वाचता येत नसल्यामुळे मी फक्त बसून ऐकत होते.

त्यांचा सराव झाल्यावर मी विचारले, "तुम्हाला एवढे चांगले मराठी वाचता कसे येते?" त्यांनी सांगितले की त्या मराठी शाळेत दर रविवारी जायच्या. त्या दिवशी घरी गेल्यावर मी आईला विचारले, "आई, मला मराठी वाचायला आणि लिहायला शिकायचे आहे. मी शिकू शकते का?"

मला तेव्हा माहीत नव्हते की माझ्या या छोट्याशा प्रश्नातून पुढे इतका मोठा प्रवास सुरू होणार आहे.

सुरुवातीला मला शाळेत यायला आवडायचे नाही, कारण होमवर्क करायचा आणि पुढे काय शिकायचे आहे हेही माहीत नव्हते. बाराखडी, आकडे, स्वर, व्यंजन—किती गोष्टी शिकायच्या होत्या!

हळूहळू मला मराठी वाचता आणि लिहिता येऊ लागले. भाषेचा अभ्यास करताना मला फक्त अक्षरे आणि शब्द शिकायला मिळाले नाहीत, तर माझ्या संस्कृतीशी आणि माझ्या मुळांशी जोडले जाण्याची एक नवीन संधी मिळाली. ही संधी मला विस्कॉन्सिनमधील उत्साही शिक्षक आणि स्वयंसेवकांशिवाय मिळाली नसती. त्यांच्याबद्दल मी मनापासून आभारी आहे.

मग 2023 मध्ये आम्ही Philadelphiaला आलो. Philadelphiaमध्ये आल्यावर आम्हाला कळले की आपल्या मंडळाची मराठी शाळा नाही. आईने लगेच पुढाकार घेतला आणि मंडळाच्या सहकार्याने Philadelphiaमध्ये मराठी शाळा सुरू करण्याचे ठरवले.

त्या उन्हाळ्यात आम्ही भारतात गेलो. पण या वेळी काहीतरी वेगळे होते: मला सगळ्या पाट्या वाचता आल्या आणि आजी-आजोबांसाठी मराठीत पत्रे लिहिता आली. माझ्या कुटुंबाला माझा अभिमान तर वाटलाच, पण मला स्वतःलाही माझा खूप अभिमान वाटला.

या सगळ्या प्रवासात मी आईला अगदी जवळून पाहिले. शाळेसाठी तिची मेहनत, मुलांसाठी काहीतरी नवीन करण्याची तिची धडपड, पालकांशी सतत संवाद आणि शाळेला एक कुटुंब बनवण्याचा तिचा प्रयत्न—हे सगळे माझ्यासमोर घडत होते.

तेव्हा मला जाणवले की मराठी शाळा म्हणजे फक्त भाषा शिकण्याची जागा नाही. ती आपल्या संस्कृतीशी जोडणारी आणि वेगवेगळ्या कुटुंबांना एकत्र आणणारी एक छोटीशी दुनिया आहे.

2026 मध्ये मी या मराठी शाळेतून माझे शिक्षण पूर्ण केले. माझ्या शालेय जिल्ह्याच्या सहकार्याने मला मराठी भाषेसाठी Biliteracy Seal मिळाला. काही वर्षांपूर्वी एका छोट्याशा मराठी वाक्याचे वाचन मला जमत नव्हते आणि आता माझ्या शालेय शिक्षणात मराठी भाषेची अधिकृतपणे नोंद झाली होती. हा क्षण माझ्यासाठी खूप खास आणि अभिमानाचा होता.

पण शाळेतून शिक्षण पूर्ण केल्यानंतर माझ्या मनात एक विचार सतत येत होता—

"मी या शाळेत शिक्षक म्हणून शिकवू शकते का?"

आता मी ज्या वर्गात एकेकाळी विद्यार्थी म्हणून बसले होते, त्याच वर्गात पुढच्या पिढीतील मुलांना मराठी शिकवण्याची माझी इच्छा आहे. हा विचार माझ्यासाठी खूपच विशेष आहे.

कदाचित अमेरिकेत वाढलेल्या मराठीच्या पुढच्या पिढीतील शिक्षकांपैकी मी पहिली असेन—पण नक्कीच शेवटची नाही.

मला आता लहान मुलांशी जोडायचे आहे. त्यांना मराठी शिकवायची आहे, पण त्याचबरोबर मराठी बोलण्याचा, वाचण्याचा आणि लिहिण्याचा आनंदही द्यायचा आहे. त्यांना आपल्या संस्कृतीबद्दल अभिमान वाटावा आणि मराठी ही केवळ घरात बोलली जाणारी भाषा न राहता त्यांच्या आयुष्याचा एक सुंदर भाग व्हावा, असे मला वाटते.

माझा प्रवास एका विद्यार्थिनीपासून मराठी शिक्षिकेकडे जाणारा आहे!

- **अनुष्का देवधर**

- (अनुष्का हायस्कूल सिनियर आहे आणि यावर्षीपासून PMM मराठी शाळेत शिक्षिका म्हणून रुजू झाली आहे).

## अभ्यासाव्यतिरिक्त गवसलेली ओळख



आठवीत शिकत असतानाच मोठी स्वप्ने आणि त्यासाठी प्रत्यक्ष कृती करण्याची तयारी, ही अरिनची खासियत आहे. त्याच्या वयातील अनेक विद्यार्थी नागरिकशास्त्र आणि इतिहासाचा अभ्यास करतात, मात्र अरिनने या विषयांना केवळ अभ्यासापुरते मर्यादित न ठेवता लोकप्रतिनिधींशी संवाद, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर चर्चा, सार्वजनिक सेवेतील प्रत्यक्ष अनुभव आणि नेतृत्वाच्या संधी यांचा सक्रियपणे स्वीकार केला आहे. त्याची जिज्ञासा, आत्मविश्वास, संवादकौशल्य आणि नेतृत्वाची वृत्ती त्याला त्याच्या वयातील इतर विद्यार्थ्यांपेक्षा वेगळी ओळख निर्माण करून देते. आठवीच्या वर्गात शिकत असतानाच केवळ स्वप्ने पाहण्याऐवजी ती प्रत्यक्षात आणण्यासाठी पावले उचलणारा अरिन, हीच त्याची सर्वांत वेगळी ओळख आहे.

अमेरिकेतील फ्लोरिडा राज्यातील टॅम्पा येथील Williams Middle Magnet School मध्ये आठवीत शिकणारा **अरिन जाधव** आज विद्यार्थी हक्क आणि समाजसेवेच्या क्षेत्रातही सक्रियपणे काम करत आहे.

**तू अजून ८वीत आहेस, पण नागरिकशास्त्र, इतिहास आणि समाजसेवेची तुला विशेष आवड आहे. या विषयांमध्ये आणि समाजासाठी काही करण्याच्या विचारात तुझी रुची कशी निर्माण झाली?**

I am actively involved in several initiatives, with one of my key focuses being advocating for students' rights. I am already working on this issue at the state level and am now working towI've always been curious about how things work in society and how decisions are made. That's probably why I started liking civics and history. I enjoy learning about how our government works, how things have changed over time, and how those changes affect people.

As I learned more, I started thinking about how young people can also have a voice and make a difference. That's what got me interested in student rights and advocacy. I'm currently working on some of these issues at the state level, and I hope to expand that work nationally in the future.

So for me, civics and history are not just school subjects. They've helped me understand what's happening around me and made me want to get involved and do something useful for other students.ard expanding my efforts to the national level. I am also a huge fan of civics and history, subjects that continue to inspire my interest in advocacy, leadership, and making a difference for students.

**तलाहासीमधील 'Florida Page and Messenger Program' मधील तुझा अनुभव कसा होता? या कार्यक्रमातून तुला काय शिकायला मिळाले? या अनुभवामुळे सार्वजनिक सेवा आणि समाजातील आपल्या भूमिकेकडे पाहण्याचा तुझा दृष्टिकोन कसा बदलला?**

Participating in the Florida Page and Messenger Program in Tallahassee was a great opportunity for me to learn about public service and Florida politics. As a student, I had the chance to experience firsthand how state government works, including how bills are written, how ideas are communicated, and how elected officials represent their communities.

One of the most meaningful parts of the program was having the opportunity to meet state representatives from the Florida House. We often hear about what happens in Washington, D.C., when we watch the news and learn about national politics. But since I live in Florida, traveling to Tallahassee, our state capital, gave me the opportunity to better understand state government and the issues that directly affect people in our communities.

This experience really broadened my perspective. By listening to different perspectives, I

realized how diverse Florida is and how people's experiences, challenges, and backgrounds can shape their views on important issues. I learned that public service is about standing up for your community and working to make it better.

Most importantly, the program taught me that a good leader is someone who listens to what people need and takes the time to understand different points of view. The Florida Page and Messenger Program gave me a deeper understanding of leadership and public service, and showed me the importance of being an engaged member of my community.

**तुला Representative Driskell आणि Congressman Maxwell Frost यांसारख्या लोकप्रतिनिधींच्या मुलाखती घेण्याची संधी मिळाली. तो अनुभव तुझ्यासाठी कसा होता? त्यांच्या बोलण्यातून तुला सर्वात महत्त्वाचे काय शिकायला मिळाले?**

Meeting with these leaders was a very meaningful and enriching experience for me. I had the opportunity to hear their perspectives firsthand and learn about issues that I had not thought about in much depth before.

Congressman Maxwell Frost was especially inspiring to speak with. Because of his age and perspective, I found it easy to connect with him on issues affecting students and education. He spoke about the long hours that teachers work and how this can ultimately affect the quality of education. He also shared that his mother was a teacher who worked long hours, which gave him a personal understanding of some of the challenges educators face.

He also introduced me to several concepts and policy ideas that were new to me, including universal healthcare and Medicare for All. I found it fascinating to learn about different approaches to addressing social and educational issues and to hear how these ideas are discussed in government.

I was also deeply impressed by Representative Driskell's perspective that the first step toward solving a problem is identifying the problem itself. That idea made me think about how important effective communication is—not only in understanding a problem, but also in explaining it to others. I realized that the way we communicate our ideas, the words we choose, and how clearly we present information can make a significant difference in whether our message is understood.

Overall, the interviews taught me that leadership is not just about having ideas or making decisions. It is also about listening, understanding different perspectives, and communicating effectively.

**विद्यार्थ्यांच्या कोणत्या समस्या किंवा मुद्द्यांकडे आपल्या लोकप्रतिनिधींनी अधिक लक्ष द्यायला हवे असे तुला वाटते? आणि लोकप्रतिनिधींसमोर कोणते मुद्दे मांडायचे हे तु कसे ठरवतोस?**

I think school should be a place where students can focus on learning and doing their best. Students already have enough to worry about with studying, assignments, and tests. I believe our representatives should pay attention to issues that create unnecessary stress or problems for students and make it harder for them to focus on their education. I would focus on issues that affect students directly and have a real impact on their ability to learn, feel supported, and succeed in school.

**Representative Johanna Lopez यांच्यासोबत इंटर्न म्हणून काम करताना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसोबत काम करणारा तू एकमेव मिडल स्कूल विद्यार्थी होतास. या अनुभवातून तुला सर्वात मोठा धडा कोणता मिळाला?**

I spent a lot of time growing up with my older brother and his friends, so working with college students during my internship did not feel very different to me. Many of these students were preparing to enter the workforce, and I was impressed by how knowledgeable they were about important issues such as property taxes and the

underfunding of high schools. This internship program gave me the opportunity to analyze and learn about a variety of different issues. For example, we analyzed immigration programs by district, and I was also responsible for preparing a briefing on deportation issues in the country. These experiences helped me understand how much research and analysis goes into understanding important issues and communicating them effectively.

Overall, this internship was a very valuable and enjoyable experience for me. I learned a lot, gained a better understanding of important issues, and had fun working with everyone throughout the program. One of my biggest takeaways was that you can learn a great deal by working with people who have different experiences and perspectives, regardless of their age.

**तुझ्या इंटर्नशिपच्या अनुभवातून, तसेच Saath सोबतच्या आगामी कामातून, नेतृत्वाबद्दलची तुझी समज कशी वाढली? या अनुभवांमुळे तुझ्या भविष्यातील ध्येयांमध्ये काही बदल/ परिणाम झाला आहे का?**

I haven't started the SAATH program yet, but I will be working with college students and people who are older than me, so I'm looking forward to learning from their experiences. I will also be creating posters and helping with other activities. I believe the SAATH program will be very helpful because it will teach me about leadership, public service, and how to make a positive impact in my community.

**YEA Leadership Award मिळाल्यावर तुला कसे वाटले? तुझ्या या प्रवासात तुला सर्वात जास्त प्रेरणा किंवा प्रोत्साहन कोणाकडून मिळाले?**

The YEA Award recognizes students who demonstrate strong leadership and meaningful contributions to their community. Through my contributions to internships and interviews, serving as my school's student representative to the government, and currently serving as President of my school's FBLA (Future Business Leaders of America) chapter, I have consistently taken opportunities to lead, represent others, and make a positive impact. I've been especially encouraged by my family, teachers, and the people I've had the opportunity to work with. Their support and guidance have motivated me to keep learning, take on new challenges, and look for ways to contribute to my community.

**तु filmmaking मध्येही काम केलेस आणि To Be a Muse च्या audio division चे नेतृत्व केले आहेस . या अनुभवातून तु creativity, teamwork आणि leadership याबद्दल काय शिकलास?**

It was a great experience and definitely a learning opportunity for me. My elder brother, Arnav Jadhao, is studying filmmaking at NYU. His film about the first Marathi immigrant in America was selected for a festival, which also gave him the opportunity to work on a movie for Amazon Prime. When the person responsible for audio left at the last minute, I took over the responsibility. It was a challenging learning curve,but I enjoyed figuring things out and working with others to get the job done. The experience taught me that leadership sometimes means stepping up when something unexpected happens, taking responsibility, and being willing to learn along the way. It also showed me how important teamwork and creativity are when working on a film.

**मीडिया, सार्वजनिक सेवा आणि नेतृत्वातील तुझ्या अनुभवांमुळे तुझ्या आवाजाची ताकद आणि त्याचा समाजात बदल घडवून आणण्यासाठी कसा उपयोग करता येतो, हे तु कसे सांगशिल?**

Public service and media work are related in many ways. Both allow us to communicate, connect with, and serve the community. However, my preference is public service. Both fields require learning how to use the tools effectively, and it takes time and experience to fully understand them. They also

both require dedication and often involve working long hours.

My experiences have taught me that having a voice is only the beginning. You also have to learn how to use the different tools available to you effectively and responsibly. Both media and public service also require dedication, teamwork, and sometimes long hours.

While I've enjoyed my experiences in media, I see myself leaning more toward public service because I enjoy working with people and finding ways to make a difference in my community.

**भविष्यात तुला काय साध्य करायचे आहे? एक तरुण नेता म्हणून तुला समुदायासाठी आणि समाजासाठी कोणता सकारात्मक बदल घडवून आणण्याचे तुझे स्वप्न आहे?**

In the future, I see myself working in politics and, more importantly, serving as a public servant. I want to work with people, strengthen communities, and find practical ways to make a positive difference.

To me, politics is a form of public service and an opportunity to represent people and their interests. I hope to become a leader who is approachable, compassionate, and accountable, and someone who listens to the community and works to make it better

**Link to refer :**

https://youtube.com/@arinsvoice?si=rmNUc-nIp9-ymM2a

https://www.wfla.com/daytime/hillsborough-countys-youth-excellence-and-achievement-awards/

- **मुलाखतकार: उत्तरा भालेराव,** टँपा, फ्लोरिडा; **अपर्णा कोळेकर,** टोरॉंटो, कॅनडा

-

## चोंक — एक अस्वल

मी एक सजग, शिक्षित पर्यावरणप्रेमी
ठेवून लक्ष चोहीकडे, फिरतो करत जागृती
चोंक एक भोळेभाबडे अस्वल
मध, फळे आणि रानमेवा खाण्यात अट्टल

**चोंक उवाच —**

तर ह्या वर्षी पेटला रानात मोठा वणवा
पाणी आणि भुकेचा बाका वानवा
खादाडच आहे माझी ही मोठी भूक,
चतकोराने अर्थातच नाही मजला सुख,
अन् ह्या भुकेपोटीच आलो आहे मी, कवी, तुझ्या सदनी
तर सख्या, रोष न करी, दया करी.

**मी —**

आहे मी डेटाचा पाईक
सगळे ७/१२ बारकाईने वाचीत
प्रश्न पडे — आहे का हा चोंक पठ्ठा इथला राजकुमार, राजबिंडा?
वाचीत वाचीत, Grok करीत
गवसे NoBrainer उत्तर —
चोंक भूमिपुत्र इथला उत्तम
मी तर ठरलो उपरा, बलुतेदार कृत्रिम
काय करावे, काय करावे, करितो चिंतन
सापडे उत्तर तंत्रज्ञानात
भल्या पहाटे सोमवारी, ६:५५ ला लावावा मोठा गजर
काढावा कचरा बाहेर
८ वाजता कचरा गाडी नेई तो कचरा तत्पर
चोंक राहील उपाशी,
म्हणेल — आम्ही जातो आमुच्या स्वजनात
कवी, तुझा कचरा तुलाच लखलाभ!
आम्ही जातो खातो मध स्वादिष्ट
आला अमुचा पर्जन्य प्रियतम!

- **आनंदसुत (Ranjan Marathe)**



## कोजागिरी — चांदण्यांपासून आठवणींपर्यंत

वर्षभरातील काही सण आणि काही खास दिवस यांची आपण अगदी आतुरतेने वाट पाहत असतो. कोजागिरी पौर्णिमा हा त्यापैकीच एक. म्हटलं तर सण, म्हटलं तर उत्सव! त्यामुळेच या दिवसाचं महत्त्व काही वेगळंच आहे. खरं तर, लहानपणापासूनच्या कितीतरी आठवणी या दिवसाशी जोडलेल्या आहेत आणि दरवर्षी कोजागिरी साजरी करताना त्या जुन्या आठवणींमध्ये नव्या आठवणींची आणखी भर पडत जाते. म्हणूनच 'कोजागिरी पौर्णिमा' म्हटलं की, डोळ्यांसमोर आठवणींची एक सुंदर मालिकाच उलगडत जाते. यावर्षी कोजागिरीला काय करायचं, कसा कार्यक्रम करायचा, याचा विचार मनात सुरू झाला होता. पण रोजच्या कामाच्या धावपळीत तो विचार कधी मागे पडला, हे कळलंच नाही.

अशातच एके दिवशी माझी मैत्रीण शलाकाचा फोन आला. ती सहज म्हणाली, "उद्या संध्याकाळी काय करतेस?" तिच्या प्रश्नानंतर मी सहजच उद्याचा दिवस पाहण्यासाठी कालनिर्णय हातात घेतला आणि अक्षरशः दचकलेच! मनाशीच म्हटलं, "अगं, मी हे कसं काय विसरले?" कारण दुसऱ्याच दिवशी कोजागिरी पौर्णिमा होती! मग क्षणाचाही विलंब न करता मी शलाकालाच म्हणाले, "तूच ये उद्या. कोजागिरी आहे. काहीतरी छान कार्यक्रम करू या." आणि मग काय… त्या एका फोनने पुन्हा एकदा जुन्या आठवणी जाग्या झाल्या.



त्यानंतर डोक्यात वेगवेगळे बेत सुरू झाले. जसे की कोणाकोणाला बोलवायचे, काय काय करायचे, गाण्याचा कार्यक्रम ठेवायचा की आपल्या मित्र मैत्रिणींचाच गाण्याचा कार्यक्रम करायचा की नुसताच जेवायचा बेत ठेवायचा. जसे जसे मी माझ्या मित्र मैत्रिणींना फोन करायला लागले तसातसा बेत ठरत गेला.

काही काही जणांना मी पहिल्यांदाच कोजागिरीसाठी बोलवत होते. त्यांच्याशी बोलताना जाणवले की, कोजागिरी पौर्णिमेचा खरा अर्थ आणि तिच्यामागची परंपरा याबद्दल त्यांना फारशी माहिती नव्हती. कोजागिरी म्हणजे फक्त एकत्र जमणे, गप्पा-गोष्टी आणि खाणेपिणे एवढीच त्यांची समज होती. त्यामुळे त्यांना कोजागिरीचे महत्त्व, ती का साजरी केली जाते आणि तिच्यामागची सुंदर परंपरा सांगताना मला खूप आनंद झाला. त्यांच्याशी हे सगळं शेअर करता करता जाणवलं की, आपल्या संस्कृतीमागचा अर्थ पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणं किती सुंदर आणि महत्त्वाचं आहे.

कोजागिरी पौर्णिमा ही आश्विन महीन्यातील पौर्णिमेला साजरी केली जाते. पौर्णिमेच्या चंद्रप्रकाशात जागरण करून लक्ष्मीची पूजा केली जाते. मुख्य म्हणजे रात्री अंदाजे मध्यरात्रीच्या सुमारास लक्ष्मी "को जागर्ति" म्हणजे कोण जागे आहे? असे म्हणत फिरत असते म्हणून तोपर्यंत जागे राहून घराची दार उघडे ठेवले की दारी आलेली लक्ष्मी घरात येईल. म्हणून या पौर्णिमेला कोजागिरी पौर्णिमा किंवा शरद पौर्णिमा असे म्हणतात.

लहानपणी ही माहिती आईने आम्हाला सांगितली होती त्याची आठवण झाली. त्याचबरोबर आई रात्री दूध आटवून त्यात दुधाचा मसाला आणि सुकामेवा घालून त्या दुधात चंद्राला बघायची, मग असे चंद्रप्रकाशयुक्त दूध त्याचा प्रसाद म्हणून घेण्याची प्रथा आहे.

कोजागिरी पौर्णिमेच्या चंद्र प्रकाशाचे विशेष महत्त्व आहे. त्यात चंद्रप्रकाशाचे, चंद्रकिरणांचे विशेष सामर्थ्य आहे. त्यासाठी मुद्दाम काही आयुर्वेदिक औषधे अश्या चंद्रप्रकाशात पसरवून ठेवतात की ज्यामुळे चंद्रकिरणांचे तेज औषधात येते आणि त्यामुळे त्या आयुर्वेदिक औषधाचे सामर्थ्य अजून वाढते. अशी काही अगदी महत्त्वाची माहिती आई द्यायची.

तर सांगायचे झाले तर, जवळजवळ सगळ्यांशी बोलताना पुन्हा पुन्हा हेच सांगत होते, कोजागिरी म्हणजे काय आणि आपण ती का साजरी करतो? आपल्या सुंदर सणांमागचा अर्थ आणि परंपरा जाणून घेणं आणि ती पुढे नेणं किती महत्त्वाचं आहे, हे जाणवलं. काहींना आपल्या सणांविषयी फारशी माहिती नसल्याचं पाहून आश्चर्य वाटलं; पण त्याच निमित्ताने आपल्या संस्कृतीबद्दल बोलता आलं आणि काही सुंदर गोष्टी त्यांच्यापर्यंत पोहोचवता आल्या, याचा आनंदही वाटला.

मी मात्र क्षणातच जुन्या आठवणींच्या विश्वात रमून गेले. लहानपणीची कोजागिरी आठवली की सर्वप्रथम डोळ्यांसमोर येते ती घराची गच्ची, अंगणात जमलेली मंडळी, आकाशाकडे पाहत केलेल्या गप्पा आणि हातातला गरमागरम मसाला दुधाचा कप. चंद्र किती सुंदर दिसतोय, आज चांदणं किती स्वच्छ आहे, दूध चंद्रप्रकाशात ठेवायचं का, अशा छोट्या छोट्या गोष्टींमध्ये त्या रात्रीचा आनंद सामावलेला असायचा.

कोजागिरी म्हणजे एकत्र येण्याचा उत्सव. कुटुंबातील मोठ्यांच्या गप्पा, मुलांचा उत्साह, मित्रमैत्रिणींची मस्करी, पारंपरिक पदार्थ आणि चांदण्याखाली घालवलेले काही निवांत क्षण, या सगळ्यामुळे कोजागिरीची रात्र मनात कायमची घर करून राहते.

काळ बदलला, घरं बदलली आणि जीवनशैलीही बदलली. पूर्वी अंगणात किंवा गच्चीवर होणारी कोजागिरी आज कधी घराच्या बाल्कनीत, कधी community gathering मध्ये, तर कधी ऑनलाइन भेटीत साजरी होते. पण तिचा गाभा अजूनही तसाच आहे, आपल्या माणसांसोबत वेळ घालवणे आणि आपल्या संस्कृतीशी नातं जपणे.

आजच्या धावपळीच्या जीवनात कदाचित पूर्वीसारखी मोठी गच्ची नसेल, शेजारीपाजारी जमण्याची संधी नसेल किंवा रात्रभर चालणाऱ्या गप्पा नसतील. तरीही एखाद्या शांत रात्री खिडकीतून दिसणारा पौर्णिमेचा चंद्र आपल्याला त्या जुन्या दिवसांकडे घेऊन जातो. कारण शेवटी कोजागिरी ही जितकी चंद्राची, तितकीच आठवणींचीही रात्र आहे.

आकाश निरभ्र असतं, चंद्र पूर्ण तेजाने चमकत असतो आणि थंडगार वारा अंगाला सुखावून जातो... अशी रात्र म्हणजे कोजागिरी पौर्णिमा. चंद्रप्रकाशाने उजळलेली ही रात्र केवळ एक सण नाही, तर आपल्या मनात जपलेल्या असंख्य आठवणींचा एक सुंदर ठेवा आहे.

चंद्र बदलत नाही, बदलतो तो काळ. परंपरा बदलत नाही, बदलते ती तिची साजरी करण्याची पद्धत. आणि आठवणी? त्या मात्र प्रत्येक कोजागिरीला नव्याने उजळतात.

एका क्षणात मन कुठे कुठे हिंडून आले, पण लगेचच जाणवले की उद्याच्या कार्यक्रमाची सगळी तयारी करायची आहे. मग परत शलाकाला फोन लावला, कोण कोण येणार त्याची यादी झाली.

जेवणाचा बेत निश्चित झाला. मी काही करणार होते, शलाका बाकीचे करणार होती. आता काय कार्यक्रम करायचा हेच ठरण्याचे बाकी होते. मग विचाराअंती ठरले की, सुरवातीला काही खेळ खेळू, नंतर गाण्याचा कार्यक्रम करु. कार्यक्रमाचे संचालन ऋशिकेषला करायला सांगू. ऋशिकेष, आमचा मित्र, तो स्टँडअप कॉमेडी शो करतो तर संचालनाबरोबर तो त्याचा स्वत:चा कार्यक्रमपण करु शकेल. अश्या तऱ्हेने सगळी योजना झाली आणि खऱ्या अर्थाने दुसऱ्या दिवशीच्या कोजागिरीची वाट पाहायला लागले.

कोजागिरी आपल्याला फक्त चंद्राकडे पाहायला शिकवत नाही , ती आपल्याला मागे वळून आपल्या आठवणींकडे पाहायला शिकवते.

- **उत्तरा भालेराव,** टॅम्पा, फ्लोरिडा

## मन...!

शब्दात सांगता येत नाही ज्याचा ठाव,
क्षणात घेते वाऱ्याच्या वेगाने धाव;
कधी स्थिर,कधी चंचल त्याचा भाव,
अमूर्त या अनुभवाचे मन आहे नाव...!
मनाच्या कोंदणात होतो उगम भावनांचा,
मनात मंथन होता मिळतो मार्ग विचारांना;
मनात रोज होतो जन्म नव्या जाणिवांचा,
मनाच्या अंबरात मिळती पंख कल्पनांना...!
मनाच्या कुशीत फुलतात क्षण आनंदाचे,
मनाच्या कुशीत विरघळतात क्षण दुःखाचे;
मन आहे माहेरघर जीवनातील सुखदुःखांचे,
मन देते बळ दुःखातही सुख शोधण्याचे...!
मनात रुजविता बीज जीवनसंस्कार जपण्याचे,
मन वटवृक्षापरी बहरुनी देते छत्र समृद्धीचे;
मनास मिळता बाळकडू आत्मिक चिंतनाचे,
मन चैतन्यमय होऊनी उघडते द्वार अद्वैताचे..!

- **शुभदा जोशी- पारखी,** कोलंबिया, मेरीलँड



## चौकटीबाहेरची झेप

"सौंदर्य हे केवळ बाह्य स्वरूपात नसते, तर ते मनाच्या समृद्धतेत, अथांग कुतूहलात आणि करुणेमध्ये सामावलेले असते." आजच्या दिखाऊ, वरवरच्या ग्लॅमरच्या आणि यशाच्या ठरावीक साच्यांमागे धावणाऱ्या जगात ही व्याख्या समजून घेणे विशेषतः प्रत्येक स्त्रीसाठी अत्यंत गरजेचे आहे. खरे सौंदर्य स्वतःला कोणत्याही बंदिस्त चौकटीत कोंडून घेण्यात नसून, आपल्यातील क्षमतेच्या सर्व फांद्या मुक्तपणे आकाशात विस्तारू देण्यात असते. याचेच एक चालते-बोलते आणि अत्यंत थक्क करणारे उदाहरण म्हणजे पुण्याच्या शारदा बापट.

त्यांचे आयुष्य म्हणजे एकाच जन्मात अनेक जन्मांचे अनुभव घेणाऱ्या एका मुक्त आत्म्याची विलक्षण गाथा आहे!

**सदाशिव पेठेतील वास्तव्या मुळे , अ-स्पर्धात्मक संस्कार**

शारदा यांचा जन्म आणि बालपण पुण्यातल्या सदाशिव पेठ, बाजीराव रोड परिसरातील एका सुसंस्कृत मध्यमवर्गीय कुटुंबात गेले. गोरा वर्ण, भेदक करडे डोळे आणि सडपातळ यष्टी लाभलेल्या शारदा यांना लहानपणापासूनच निसर्गाची, संगीताची आणि विविध कलांची विलक्षण ओढ होती. कानांतील पारंपरिक हिऱ्यांची कुडी आणि डाव्या मनगटावरील नाजूक घड्याळ त्यांच्या साध्या पण खानदानी व्यक्तिमत्त्वाला खुलवून दाखवायचे.

त्यांचे संगोपन अत्यंत अ-स्पर्धात्मक आणि सहकार्याच्या वातावरणात झाले. "कोणतीही गोष्ट केवळ बक्षीस मिळवण्यासाठी किंवा दुसऱ्याला हरवण्यासाठी करायची नसते; तर ती मुळापासून आणि आनंदाने अनुभवण्यासाठी करायची असते," हा त्यांच्या आई-वडिलांनी दिलेला विचार त्यांच्या जगण्याचा पाया ठरला.

शालेय वयात त्यांच्या संवेदनशील मनावर सर्वात खोल ओरखडा उमटवला तो त्यांच्या आईच्या प्रदीर्घ आजारपणाने. आईच्या विविध व्याधींचे निदान शोधताना वैद्यकीय शास्त्रातील क्लिष्टता आणि गुंतागुंत पाहून त्यांच्या मनात मानवी शरीराबद्दल, आरोग्याबद्दल सखोल कुतूहल निर्माण झाले.

पण नियतीचा खेळ बघा—प्राण्यांबद्दल असलेल्या अतीव प्रेमामुळे आणि दयेमुळे त्यांना बेडकाचे किंवा बाकी प्राण्यांचे डिसेक्शन करणे अजिबात मान्य नव्हते! त्यामुळं त्यांनी अकरावीत सायन्स सोडून चक्क आर्ट्सचा मार्ग निवडला. पुढे जाऊन त्यांनी इंग्रजी साहित्यात बी.ए. केले.

**अष्टपैलू: एकाच आयुष्यात अनेक क्षितिजे**

शारदा या खऱ्या अर्थाने बहुप्रतिभावंत आहेत. आर्ट्समधून पदवी घेतल्यानंतर त्या एकाच साच्यात अडकून पडल्या नाहीत. त्यांनी त्या काळात संगणकाचे कोडिंग शिकून वित्तीय संस्थांसाठी 'Foxbase' वर स्वतः विकसित केलेले सॉफ्टवेअर यशस्वीपणे विकले. एवढेच नव्हे, तर इलेक्ट्रॉनिक सुरक्षा उपकरणांच्या व्यवसायात भक्कम भागीदारी सांभाळताना त्यांनी कायद्याचा सखोल अभ्यास करून 'एलएलबी' (LLB) पदवीदेखील संपादन केली.

सगळं काही सुरळीत सुरू होतं. संसाराचा गाडा छान चालला होता. पण त्यांच्या आत कुठेतरी ते बालपणीचे वैद्यकीय विज्ञानाचे कुतूहल शांत बसू देत नव्हते.

वयाच्या ३५ व्या वर्षी त्यांच्या आयुष्याला एक ऐतिहासिक आणि धक्कादायक वळण मिळाले. २००१ मध्ये अमेरिकेत एका रोड ट्रिपदरम्यान, त्यांच्या एका मैत्रिणीच्या इंजिनिअर पतीने वयाच्या एका टप्प्यावर करिअर बदलून डॉक्टर बनल्याची सत्यकथा त्यांना कळली. शारदा यांच्या मनात एक विजेची ठिणगी पडली—"जर हे अमेरिकेत शक्य आहे, तर माझ्या भारतात का नाही? वयाची अट माझ्या स्वप्नांच्या आड का यावी?"

**यशाची अग्निपरीक्षा आणि अश्रूंतून वाट**

वयाच्या ३५ व्या वर्षी, संसाराच्या मध्यावर असताना, पुन्हा वैद्यकीय प्रवेशासाठी धडपडणे हे तत्कालीन समाजाच्या दृष्टीने निव्वळ 'वेडेपणाचे' लक्षण होते. पण त्यांचे बालमित्र आणि पती नरेंद्र (नंदू) बापट यांनी सुरुवातीचे आश्चर्य बाजूला सारून त्यांना हिमालयासारखा भक्कम पाठिंबा दिला.

शासकीय नियमांचे काटेरी अडथळे पार करत, माजी महाविद्यालयाकडून एनओसी मिळवून, शारदा पुन्हा एकदा हुजूरपागेत शाळकरी मुलींसोबत बारावी सायन्सच्या वर्गाच्या बाकावर बसल्या! संपूर्ण पेठेत आणि नातेवाइकांमध्ये कुजबुज सुरू होती. पण शारदा यांचे लक्ष केवळ ध्येयावर होते.

परंतु, नियती त्यांची आणखी एक कठोर परीक्षा पाहणार होती. बारावीच्या अंतिम बोर्ड परीक्षेच्या अवघ्या दोन आठवड्यांपूर्वी त्यांच्या आईचे आकस्मिक निधन झाले—ज्या आईच्या आजारपणामुळे त्यांनी हे स्वप्न पाहिले होते, तीच सावली अचानक हरपली. दुःखाचा डोंगर कोसळला. खचून गेलेल्या शारदा यांना नंदू यांनी धीर दिला आणि परीक्षेला बसवले. डोळ्यांतील अश्रू पुसत, आईच्या आठवणी उराशी बाळगून त्यांनी पेपर लिहिले आणि चक्क ७५% गुणांसह बारावीची अग्निपरीक्षा उत्तीर्ण केली!

**परदेशातील वादळे आणि आकाशातली झेप**

भारतातील क्लिष्ट नियमांमुळे क्लिनिकल रोटेशनचा मार्ग खडतर बनला, तेव्हा त्यांनी थेट फिलिपाइन्सच्या अँजेलिस युनिव्हर्सिटीमध्ये प्रवेश घेण्याचे धाडस दाखवले. आपल्या १३ वर्षांच्या मुलाला आणि पतीला भारतात सोडून, एका अनोख्या देशात एकटीने राहणे सोपे नव्हते. (इथे नंदू यांनी पुण्यात चक्क 'पुरुषांसाठीच्या कुकिंग क्लास'मध्ये जाऊन स्वयंपाक शिकून घर सांभाळले!)

फिलिपाईन्समध्ये शुद्ध शाकाहारी शारदा यांनी सुरुवातीला स्थानिक गुरुद्वारामधील लंगर खाऊन दिवस काढले. आईच्या निधनानंतर आलेल्या मानसिक सुन्नतेतून बाहेर पडण्यासाठी त्यांनी स्वतःला आणखी एक अचाट आव्हान दिले—त्यांनी क्लार्क एअर बेसवर थेट वैमानिक (Pilot) होण्याचे प्रशिक्षण सुरू केले!

पहिल्याच सोलो फ्लाईट दरम्यान अचानक आलेल्या भयानक मान्सून वादळात त्यांचे छोटे विमान रस्ता भरकटले. खाली अथांग ढग आणि दिशाहीन आकाश. पण अत्यंत शांत डोक्याने एका मॉलच्या छताचा लँडमार्क म्हणून वापर करत त्यांनी ते विमान जमिनीवर सुखरूप उतरवले. त्यानंतर मनिलाच्या वादळी ट्रॅफिकमध्ये तुडुंब बस आणि सायकल-रिक्षाच्या प्रवासात प्रचंड हाल सोसत त्यांनी परीक्षा दिली आणि खांद्यावर 'पायलट विंग्ज' (Pilot Wings) मिळवले!

त्यानंतर सुरू झाले वैद्यकीय शिक्षणातील सर्वात अमानुष मानले जाणारे 'क्लेर्कशिप' वर्ष—३६५ दिवस एकही सुटी न घेता, दर तिसऱ्या दिवशी ३६ तास सलग ड्युटी! शरीराचा कण न् कण थकला होता, पण डोळ्यातील स्वप्न जिवंत होते...

**आणि मग काय घडले?**

परदेशातील हे खडतर शिक्षण संपवून जेव्हा शारदा भारतात परतल्या, तेव्हा त्यांच्यासमोर भारताच्या वैद्यकीय व्यवस्थेचे, कौन्सिलच्या नियमांचे आणि लालफितीच्या कारभाराचे असे काही चक्रव्यूह उभे राहिले, ज्याची कल्पनाही त्यांनी केली नव्हती.

एका बाजूला दोन वेगवेगळ्या दशकांतील बारावीच्या दोन वेगवेगळ्या मार्कशीट, दुसऱ्या बाजूला परदेशी वैद्यकीय पदवी, वाढलेले वय आणि भारतीय मेडिकल कौन्सिलचे कडक नियम! एका मध्यमवर्गीय स्त्रीने व्यवस्थेच्या या अजस्र भिंतीला कशी धडक दिली असेल?

त्या ३६ तासांच्या अखंड ड्युट्या, वादळात भरकटलेले विमान, आईचा विरह आणि समाजाचे टोमणे सहन करणारी ही जिद्दी स्त्री अखेर डॉक्टर बनू शकली का? की नियती आणि सरकारी नियमांच्या चक्रव्यूहात त्यांचे हे अद्वितीय स्वप्न अधुरेच राहिले?

संपूर्ण प्रेरणादायी प्रवास, त्यांच्या या थक्क करणाऱ्या संघर्षाचा उत्कंठावर्धक शेवट, त्यानंतर त्यांच्या आयुष्याला मिळालेली अनपेक्षित दिशा आणि एका ५० वर्षांच्या महिलेने रचलेला नवा इतिहास यूट्यूबवरील लघुपटात उपलब्ध आहे.

- **सौ. भाग्यश्री इंदाणे,** पोर्टलंड, ऑरिगॉन

## ध्यान स्वर

तुझ्याच ठायी षड्ज आरंभ, तुजसि आद्य स्मरावा
तुझिया समीप विरून गीते, अभिनव स्वर उमटावा
गीत स्वरांचे भावुक होऊनि, रमती तुझ्याचपाशी
सचेत लहरी स्वर तालांच्या, स्वाधीन तव चरणांशी
आळविता हर एक स्वर, ध्यान तुझे लागो
निषाद साधूनि साध्य आवर्तन, निश्चल पंचम लाभो
तालात रंगूनि सूर दंगले, दंग आभा चहुदिशी
स्वर अवघे तद्रूप होऊनि, विलीन छंद तुजपाशी

- **चैत्राली काटे-यादव**

संकल्पना : गौतम पंगू रेखाटन: शीतल रांगणेकर



# पुढच्या महिन्यात येतो आहे...

**बृहन्महाराष्ट्र वृत्ताचा दिवाळी अंक!!!**

**दिवाळीच्या आनंदात भर घालण्यासाठी घेऊन येत आहोत एक खास मेजवानी—**
**तुमच्या आवडत्या बृहन्महाराष्ट्र वृत्ताचा दिवाळी अंक!**
**या अंकात असेल...**

- उत्तर अमेरिका आणि जगभरातील लेखकांचे दर्जेदार लेख, कथा आणि कविता
- बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या विविध उपक्रमांची माहिती
- स्थानिक मंडळांच्या वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमांच्या वार्ता
- चित्रं, व्यंगचित्रं, शब्दकोडी आणि बरंच काही...

**आणि हे सगळं एका नव्या, देखण्या डिजिटल आणि छापील रुपड्यात!**
**दिवाळी अंकाची छापील आवृत्ती तुम्हांला घरपोच हवी आहे का ?**
**तर मग हा फॉर्म भरुन आम्हांला जरुर कळवा:**

Click on the link:
https://forms.gle/u1wdGcqu4Bod6jfJ9 OR Scan

**आणि हो... पुढच्या महिन्यात आमचा दिवाळी अंक वाचायला विसरु नका!**
**अंकाच्या बातम्या आणि अपडेट्ससाठी...**
**बीएमएमला फेसबुकवर @bmmonline.org आणि**
**इन्स्टाग्रामवर @bmm.northamerica फॉलो करा.**



## म्हणून आम्हा गांधी पाहिजे!

स्वातंत्र्य आमचे बहुमोलाचे,
स्वातंत्र्यवीरांच्या बलिदानाचे.
आज स्वार्थ नडले ज्याचे-त्याचे,
म्हणून गांधी पाहिजे l 1 l

जातींची बंधणे सैल झाली,
परि कलुषितता त्यात लपली,
धर्मांधांची आग पेटली ,
म्हणून आम्हाला गांधी पाहिजे l 2 l

शिक्षण भ्रष्टाचारात अडे ,
बेरोजगारांची निघती तांडे .
चारित्र्य धारातीर्थी मृतवत पडे,
म्हणून गांधी पाहिजेl 3 l

शेतकरी कैचीत अडला,
निसर्ग कोपाने पुरा गाडला .
व्यापार -नीतीने नाडला ,
म्हणून आम्हा गांधी पाहिजे l 4 l

राजकारणाचे निघाले धिंडवडे ,
अन मोडले सगळे पायंडे.
सत्तेसाठी काहीही करती पाखंडे,
म्हणून गांधी पाहिजे l 5 l

राजकारण पाहा जगाचे ,
प्राबल्य आहे सर्वत्र ठग्यांचे .
होती भांडणे शेजारी सग्यांचे ,
मिटविण्या गांधी पाहिजे l 6 l

जगाने दोन महायुध्दे पाहिले ,
दारूण नर संहार जाहले .
युध्दाचे ढग आजही उगवले ,
म्हणून आम्हा गांधी पाहिजे l 7 l

अंतराळस्वारीच्या करती बाता,
देती मंगळ-वस्तीची वार्ता.
मिळवती अवकाशावरी सक्ता,
म्हणून गांधी पाहिजे l 8 l

अंतराळी जाऊन करतील युध्द,
कशी राहील मानवता शुध्द ?
तेथे नसेल कोणी बुध्द ,
म्हणून आम्हा गांधी पाहिजे l 9 l

प्रगतीचा पिटला जरी डांगोरा,
माणूस माणुसकी विसरला.
सत्यअहिंसाशांती माणसात पेरण्या,
म्हणून आम्हाला गांधी पाहिजे l 10 l

- **प्रा.जनार्दन श्रावणजी ददगाळे,** मिलवॉकी




We cater to Maharashtrian Artists in North America.
Providing a platform to share their artwork including Paintings, Sketches, Photographs & Digital art.

Collaborating with BMM, we publish artist's paintings for Marathi mandal members, showcasing their work & generating revenue. The sale of artwork benefits both BMM & Mandals financially.



***Burst of Yellow***
**Artist: Anil Sawe**
Dimensions: 24″x20″
Medium: Oil on canvas
Price: $ 650
Mandal: Bay Area MM



***Red Rock Radiance***
**Artist: Alpana Dhond**
Dimensions: 12″ x 16″
Medium: Soft Pastels on Canson Mi Teintes
Price: Not for Sale
Mandal:



***Golden Beauty***
**Artist: Neelima Gole**
Dimensions: 12″x 9″
Medium: watercolor
Price: $ 350
Mandal: Maharashtra Mandal of Jacksonville



***Hello Spring***
**Artist: Manish Rajguru**
Dimensions: 16 ″x20″
Medium: Watercolor on Paper
Price: Not for Sale
Mandal: BMM Louisville KY



***Santa Fe Morning***
**Artist: Shubhangi Mantri**
Dimensions: 12″x 16″
Medium: Watercolor
Price: $300



***Kelvan***
**Artist: Prerana Kulkarni**
Dimensions: 12" x 16"
Medium: Watercolor
Price: $ 1400
Mandal: MMLA

Pay: zelle@bmmonline.org or paypal@bmmonline.org | Contact: artists@bmmonline.org
Buyers & Sellers Pl fill out forms at https://bmm2.page.link/artists
*The buyer is responsible for shipping and handling.


AVANA
SENIOR CARE
Pune, India
PEACE OF MIND FOR YOU & YOUR LOVED ONES
Professional senior care with a personal touch.
Co-Founded by Ms Niharika
MHA- Mount Sinai Hospital, NY
Senior Living Mgt - Cornell University, NY
SERVICES WE OFFER
Independent Living
Assisted Living
Day Care
Wellness & Rehabilitation
Medical Support & Emergency Management
Pet Therapy & Companionship
TRY BEFORE YOU DECIDE
BOOK A TRIAL STAY TODAY!
+91 9090070782
avanaseniorcare.com


ICICI Bank
USA
Remit money to any bank in India with Money2India
Promo Code IND40
for an enhanced rate of 40-paise*
Key Features:
Competitive exchange rates and instant transfers**
Zero fee for transfers above USD 1,000
Send USD 300,000 or more in a single transaction#
Scan the code to register now
575, 5th Avenue, Suite 2600, New York, NY 10017
+1-646-827-8450
moneytoindia@icicibank.com
www.money2india.com
T&Cs apply.
*The 40-paise better rate applies to the first transfer up to USD 1,500. Standard rates apply for additional amounts. The offer is valid for new customers for 60 days from the date of registration.
**Instant transfers are available only to express customers and credit usually takes less than 4 hours and depends on US and Indian banking hours.
#Transactions above USD 300,000 require additional documentation and approvals, as per applicable regulations.

# *Neem*
# For Your Soil.

100% Neem Cake Organic Plant Fertilizer




+ natural pest & pathogen control

+ slow-release

+ improves soil texture

WONDERTREE™ Organics

**BETTER GARDENING THROUGH BETTER SOIL**

# Bank of Maharashtra

**VALID TILL 30th Sep'26**



# ATTRACTIVE FCNR DEPOSIT RATES

**Secure & grow your foreign currency savings with Bank of Maharashtra**

## US DOLLARS

| 6.15% | 6.25% | 6.60% |
|---|---|---|
| 3-4 Years | 4-5 Years | 5 Years Only |

**SAFE & SECURE** – Deposits are held with a trusted Indian Bank

**ATTRACTIVE RETURNS** – Earn higher interest rates on your foreign currency

**FLEXIBLE TENOR** – Choose tenor that suits your financial goals

**FCY [USD] LOAN** – Avail loan against your FCNR(B) deposit

## WHY CHOOSE FCNR DEPOSITS?

- Deposit in Foreign Currency, Earn in Foreign Currency
- Repatriable principal and interest
- Hedge against currency fluctuations
- Ideal for NRIs, PIOs & OCIs
- Loan facility available against FCNR(B) deposits

## LEGEND LOAN FACILITY ON FCNR(B) DEPOSIT (USD) VIA IFSC BANKING UNIT

Under this facility, your FCNR(B) deposit is lien-marked in favour of our IFSC Banking Unit, GIFT City. Based on the lien, we will extend a foreign currency loan to you against a prescribed margin. You continue to earn interest on your FCNR(B) deposit while paying interest and applicable fees on the loan, thereby enhancing your overall return on your capital.

## ILLUSTRATION: SPECIAL LOAN AGAINST FCNR(B) DEPOSITS

### SCHEME FEATURES

- Flexible Tenure Options (Min 3 years and max 5 years)
- Tax Exempt & Fully Repatriable Funds
- Loan Multiplier (Up to 9x Initial Deposit)

### SCHEME ILLUSTRATION

Customer Deposit **USD 100,000** (9x loan)

Maximum Loan **USD 900,000**

Total FCNR Deposit **USD 1,000,000**

**LOAN INTEREST RATE (IBU)**

| TENOR | ROI (p.a.) |
|---|---|
| 3 Years | 5.85% |
| Above 3 Years up to 5 Years | 6.00% |

## KEY BENEFITS

- Enhanced returns through FCNR(B) deposit leveraging strategy
- Attractive effective yields compared to standalone deposits
- USD-denominated investment, mitigating INR exchange rate risk
- Fixed Loan Rate ensures zero interest rate risk

The 5-year tenure offers the highest effective yield, making it the most rewarding option for customers seeking enhanced USD returns.

## SPECIAL FCNR(B) DEPOSIT RATES & OVERALL EFFECTIVE YIELD

| PARTICULARS | 3 YEARS (6.15%) | 4 YEARS (6.25%) | 5 YEARS (6.60%) |
|---|---|---|---|
| Customer Contribution | USD 100,000 | USD 100,000 | USD 100,000 |
| Loan Amount | USD 900,000 | USD 900,000 | USD 900,000 |
| Total FCNR Deposit | USD 1,000,000 | USD 1,000,000 | USD 1,000,000 |
| FCNR Deposit Rate (p.a.) | 6.15% | 6.25% | 6.60% |
| Loan Interest Rate (p.a.) | 5.85% | 6.00% | 6.00% |
| **ANNUALISED RETURN** | **9.77%** | **9.76%** | **14.81%** |

**LOCK-IN PERIOD 1 YEAR**

**Note:** Interest rates are per annum (p.a.) and compounded half-yearly. Illustration above is indicative. Actual results may vary based on exact tenor, compounding frequency and other applicable charges as per scheme terms.



BVG INDIA LTD
Humanity Ahead
India's Largest Integrated Services Company
Started in 1997 with a team of 8, Currently having 1,00,000+ Employees 205+ Cities in 29 States & UTs of India
1400+ Clients across India from all the sectors 2500+ Operating Sites – Maintaining an area of 650 Mn+ Sq. Ft.
1500+ Ambulances with skilled staff & equipment, helped 15 Mn+ patients 1000+ First Response Vehicles, helped 19 Mn+ citizens
2 Mn+ Sq. Mt. greenery maintained & 1 Mn+ trees planted Waste Management of 3500+ MT
EXCLUSIVE SERVICES FOR BMM MEMBERS
Airport & Travel Assistance
• Airport Meet & Greet
• Pickup & Drop Services
• Chauffeur-driven Vehicles
• End-to-End Travel Coordination
• Hotel & Stay Arrangements
Medical Tourism & Health Care
• Online Doctor Consultation
• Hospital Selection & Second Opinions
• Admission Assistance
• Treatment Planning
Elder & Parent Care
• 24×7 Emergency Assistance
• Ambulance Support
• Health Check-ups
• Home Nursing & Caregivers
• Senior Citizen Support Services
Spiritual & Pilgrimage Assistance
• Temple Darshan Planning
• VIP Darshan Coordination
• Religious Tours
• Accommodation & Travel Management
Property Care & Management
• Property Inspections
• CCTV Monitoring
• Property Maintenance
• Legal & Revenue Representation
• Tenant & Rental Management
Exclusive Member Benefits
• Priority Assistance
• Preferential Pricing
• Dedicated Support Team
• Access to Verified Service Partners
Hanmantrao Gaikwad
Chairman & MD, BVG Group
BVG LIFE SCIENCE LTD
Blending Traditional Knowledge with Modern Scientific Methods!
• Cancer Care
• Heart Care
• Liver Care
Contact no.: +91 7722 00 2581
Toll Free No.: 1800 268 1818
www.bvglife.com
BVG INDIA LTD
Address : Midas Tower, 4th Floor, Phase 1, Rajiv Gandhi Infotech Park, Hinjawadi, Pune, Maharashtra 411057
www.bvgindia.com www.bmmonline.org/bvg/
bmm@bvgindia.com +918055 99 2227




Where Your Journey Begins.
Discover your perfect home.
We believe in creating living spaces that are more than just a place to stay they are the foundation for your future.
JOURNEY SO FAR
43+ Years of legacy
120+ Completed projects
32+ Lakhs sq. ft. developed area
2200+ Happy customers
KOTIBHASKAR
Infrastructures & Developers Pvt. Ltd.
आम्ही मनात घर करतो
020-25654110 | +91 9134 616161, +91 9134 717171
sales.pune@kotibhaskar.com | www.kotibhaskar.com


SYMBIOSIS
INTERNATIONAL (DEEMED UNIVERSITY)
॥वसुधैव कुटुम्बकम्॥
Pune | Nashik | Bengaluru | NOIDA | Hyderabad | Nagpur | Dubai (UAE)
A legacy of 50+years
"Promoting International Understanding through Quality Education"
Represented by
Dr. Rajiv Yeravdekar
MD, Ph.D, FRCPS (Glasgow) FRCOG (London)
Provost,
Faculty of Medical & Health Sciences
SIU
Law
Design
Management
Medical & Health Sciences
Computer Studies
Media & Communication
Humanities & Social Sciences
Education
Engineering
Please visit: www.siu.edu.in
Jammu & Kashmir
Himachal Pradesh
Punjab
Uttarakhand
Haryana
Rajsthan
Uttar Pradesh
Sikkim
Arunachal Pradesh
Assam
Nagaland
Meghalaya
Manipur
Bihar
Jharkhand
West Bengal
Mizoram
Gujarat
Madhya Pradesh
Chhattisgarh
Odisha
Maharashtra
Telangana
Goa
Andhra Pradesh
Karnataka
Tamil Nadu
Kerala
scan to know more
WORLD UNIVERSITY RANKINGS 2027
655th Globally
19th in India
Times Higher Education Sustainability Impact Ratings 2026
301 – 400 in the world
6th in India
शिक्षा मंत्रालय MINISTRY OF EDUCATION
Category - I University
NAAC A++
nirf NATIONAL INSTITUTIONAL RANKING FRAMEWORK
24th in the University Category
7th in Law Category
11th in Management Category
46th In Engineering Category




Shreepati Group
Reaching new skies

"Aaradhya Avaan" Project is being jointly developed by Shreepati Skies (R R Chaturvedi) ("Promoter 1") and Man Vastucon LLP ("Promoter 2") (collectively "Promoters") via MahaRERA registration no. P51900048675. The details of the said Project are available on the website of MahaRERA at https://maharera.mahaonline.gov.in under registered projects. All Brochures/ Leaflets/ Pamphlets/ ads/ walk through presentations/ master plan/ layout plan or any other document including photographs, images, designs, 3D models, plans, specifications, layout, dimensions, facilities, vegetation, features, furniture & fixtures, amenities and communication, are merely an artistic impression and imagination and may vary to actual project on site. The actual and physical features, amenities and facilities in the said Project or the flat/apartment/unit would be in accordance with plans and specifications approved by the competent authorities. The said Project is mortgaged in favour of IDBI Trusteeship Services Limited (acting as Security Trustee for IndusInd Bank Limited ("the Lender")). No Objection Certificate from the Lender will be provided for sale of flat/apartment/unit in the said Project, if required.




Shreepati Group
Reaching new skies
M MEHTA™
LEGACY REALTY

This communication is purely conceptual and not a legal offering. The project amenities and facilitates are subject to final approval by the concerned authority. The list of standard offerings, amenities and other details are available for verification at site. Intending purchasers are requested to verify all the details before acting in any manner with respect to the projects. The projects are mortgaged in favour of IDBI Trusteeship Services Limited acting as Security Trustee for IndusInd Bank Limited. Disclaimer: No animals were harmed in this campaign.



Are you investing in real estate, or peace of mind?
Homecoming Reimagined at Yashada Realty. Thoughtfully designed homes and commercial spaces, in prime locations, connectivity, facilities and thriving communities combined with international quality standards and amenities.
NRI PRIVILEGE PROGRAM
2%
STAMP DUTY WAIVER*
*Will be paid by developer
For Details & Registration
+91 89565 47323 | nri@yashadarealty.com
ONGOING PROJECTS
Ravet
Punawale
Baner
Wakad
Mamurdi
YASHADA™
REALTY
LIVYNG, REIMAGINED
PUNE • INDIA

**BMM CHESS TOURNAMENT – 2026**

## Calling all chess enthusiasts across North America! 🇺🇸 🇨🇦

**Registration Link -**
https://www.zeffy.com/en-US/ticketing/bmm-chess-tournament-oct--2026

Join us for the BMM Online Chess Tournament and showcase your skills, strategy, and sportsmanship at the North America level! 🏆

📅 **Date: October 15, 2026**
⏰ **Time: 8:30 PM EST**
💻 **Location: Online – Chess.com**
👥 **Three Groups:**

♟ **Kids**
♟ **Teens**
♟ **Adults**

🌟 **Why Participate?**

• Compete with chess players across North America
• Showcase your skills and strategic thinking
• Build confidence and sportsmanship
• Connect with the Marathi community through chess

📲 Register Now:
Scan the QR code on the poster or register here:
BMM Chess Tournament Registration
https://www.zeffy.com/en-US/ticketing/bmm-chess-tournament-oct--2026

♟ **Come Play. Compete. Connect. Celebrate!**
**BMM – Bruhan Maharashtra Mandal**

